॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 OFFICE OF THE DIRECTOR OF EXAMINATIONS & EVALUATION website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215294 E-mail: directorboee@srtmun.ac.in

जा.क्र. उन्हाळी परीक्षा-२०२६/समन्वय/२०२५-२६/८७३३ दिनांक :२७/०३/२०२६

## दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी महत्वाच्या सूचना

प्रति,
मा.प्राचार्य, केंद्रप्रमुख व समन्वयक,
सर्व संलग्नित महाविद्यालय/परीक्षा केंद्र,
जिल्हा/तालुका मूल्यांकन केंद्र,
उन्हाळी-२०२६ परीक्षा, प्रस्तुत विद्यापीठ.

विषय: प्रस्तुत विद्यापीठाच्या उन्हाळी-२०२६ परीक्षेत बसणा-या दीव्यांग विद्यार्थ्यासाठी परीक्षा देणे व उत्तरपुस्तिकेचे मूल्यांकनाच्या सोयी-सुविधा बाबत.

महोदय,

उपरोक्त परिपत्रकान्वये सर्व संबंधीतास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठातील संलग्नित महाविद्यालयातील सर्व पदवी, पदव्युत्तर व व्यावसायिक अभ्यासक्रमातील प्रवेशीत दीव्यांग विद्यार्थ्यांना परीक्षा देण्यासंबंधी व संबंधीताच्या उत्तरपुस्तिकांच्या मूल्यांकनाबाबत द्यावयाच्या सोयी-सुविधा खालील प्रमाणे आहे.

०१. दीव्यांग विद्यार्थ्यांची परीक्षेकरता बैठक व्यवस्था तळ मजल्यावर करण्यात यावी.

०२. दीव्यांग परीक्षार्थी पेपर लिहिण्यास असमर्थ आहेत त्यांना लेखनिक वापरण्यास परवानगी देण्यात यावी व लेखनिक पूरविण्यात आला असेल तरच परीक्षेकरीता अर्धातास वेळ वाढवून देण्यात यावा.

०३. ज्या महाविद्यालयात पदवी/पदव्युत्तर/व्यावसायिक अभ्यासक्रमांना दीव्यांग विद्यार्थ्यानी प्रवेश घेतलेला आहे, अशा विद्यार्थ्यांना त्याच महाविद्यालयात परीक्षा देण्याची सुविधा विद्यापीठाने दिलेली आहे. संबंधीत विद्यार्थी कोणत्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला आहे. त्या अभ्यासक्रमाच्या वेळापत्रकानुसार आवश्यक असणा-या प्रश्नपत्रिका पाठविण्याबाबत विद्यापीठास कळवावे. जेणे करून त्या विद्यार्थ्यांची प्रश्नपत्रिका संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्याच्या इमेलवर पाठविण्यात येईल.

०४. दीव्यांग विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या उत्तरपुस्तिका मूल्यांकन केंद्रावर न पाठविता त्याच महाविद्यालयातील शिक्षकांकडून मूल्यांकन करून गुण यादी व उत्तरपुस्तिका विद्यापीठाकडे सादर करण्यात यावी.

०५. दीव्यांग विद्यार्थ्यांच्या उत्तरपुस्तिकेचे मूल्यांकन करतांना स्पेलिंग, व्याकरण, विराम चिन्हे न दिल्यास याबाबतीत गुण दान कमी करण्यात येवू नये.

०६. दीव्यांग विद्यार्थ्यांना परीक्षेदरम्यान गणितीय पाटीचा वापर करण्यसाठी परवानगी देण्यात यावी.

०७. दीव्यांग विद्यार्थ्यांना परीक्षा कालावधीत आवाजाच्या गणक यंत्राचा वापर करण्यास परवानगी देण्यात यावी.

०८. अंशत: दीव्यांग विद्यार्थ्यांना उत्तरपुस्तिका लिहिण्यासाठी स्केचपेनचा व प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी ग्लास मॅग्नीफायरचा वापर करण्यास परवानगी देण्यात यावी.

सबब, उपरोक्त सुचनांची नोंद घेऊन दीव्यांक विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेणे व त्यांच्या उत्तरपुस्तिकांचे मूल्यांकन करून घेण्याची व संबंधीत गुणयाद्या विद्यापीठाकडे सादर करण्याची कार्यवाही करून विद्यापीठास सहकार्य करावे ही विनंती.

श्री.एच.एस. साबळे
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव: मा.कुलगुरू महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.
मा.प्र-कुलगुरू महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.